क्रमांक प्रशि./पो.शि.चा.भरती/सन २०१९/४३४/२०१९
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई ४०० ००१.

दिनांक :-०३/१२/२०१९.

## -: उमेदवारांचा माहितीसाठी :-

महाराष्ट्र सहायक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम, २०१९ मधील नियम ६(क)(१) नुसार पोलीस शिपाई चालक पदासाठी **अनुज्ञप्ती (Licence) अदा करण्याकरिता प्राधिकृत केलेले सक्षम प्राधिकारी यांनी अदा केलेला हलके वाहन (LMV-TR) चालविण्याचा वैध परवाना धारण करणे आवश्यक आहे.** उमेदवारांना हलके वाहन (LMV-TR) चालविण्याचा वैध परवाना प्राप्त करुन घेण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा यासाठी पोलीस शिपाई चालक पदासाठी आवेदन अर्ज करण्याची मुदत दिनांक २२.१२.२०१९ ऐवजी दिनांक ०८.०१.२०२० पर्यंत वाढविण्यात येत आहे.

२. जिल्हा पोलीस बल व लोहमार्ग पोलीस बलातील पोलीस शिपाई चालक व राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई पदाच्या सन २०१९ च्या भरती प्रक्रियेत आवेदन अर्ज स्विकारण्याची कार्यवाही एकाच कार्यप्रणालीद्वारे केली जात असल्याने, पोलीस शिपाई चालक पदासाठी आवेदन अर्ज सादर करण्यासाठी देण्यात आलेली वरील मुदतवाढ ही राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस शिपाई पदासाठी आवेदन अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनाही लागू राहील.

**( संजय सक्सेना )**
**अपर पोलीस महासंचालक,**
**प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

Scanned by CamScanner

क्रमांक. प्रशि पो शि चालक भरती/५८९/२०१९
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई ४०० ००१

दिनांक :-०९/१२/२०१९

## -: उमेदवारांचा माहितीसाठी :-

"सिव्हील अपील क्रमांक ५८२६/२०११ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३.७.२०१७ रोजी दिलेला निर्णय व त्या अनुषंगाने केंद्र शासनाने क्रमांक RT-११०२१/४४/२०१७-MVL, दिनांक १६.०४.२०१८ च्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता, हलके वाहन (LMV) चालविण्याचा किंवा हलके वाहन (LMV-TR) चालविण्याचा वैध परवाना धारण करीत असलेल्या उमेदवारांनी पोलीस शिपाई चालक पदासाठी आवेदन अर्ज भरतांना "हलके वाहन (LMV-TR) चालविण्याचा वैध परवाना धारण करण्याबाबत विचारलेल्या प्रश्नासाठी" 'होय (Yes)' असे नमूद करुन अर्ज भरावा".

( संजय सक्सेना )
अपर पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

Scanned by CamScanner